**Journal of East-West Thought**
**ISSN: *2168-2259 (online)***
***(https://jetjournal.us/)***
**Volume 15, Issue 1 – 2025**

**Impact Factor: 7.665, UGC CARE I**

# महाराष्ट्रातील शासकीय जिल्हास्तरीय ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रह: एक अभ्यास

**सचिन भाऊराव काळे,** ग्रंथपाल तथा संशोधक विद्यार्थी**,** वेस्ट खान्देश भगिनी सेवा मंडळ संचलित कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, देवपूर, धुळे

**डॉ. विलास अशोकराव काळे**, ग्रंथपाल तथा संशोधक मार्गदर्शक, स्वातंत्र्य सैनिक सुर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा (जं) ता. पूर्णा जि. परभणी

**सार** :

प्रस्तुत लेखामध्ये संशोधकाने महाराष्ट्र राज्यातील जिल्हा शासकीय ग्रंथालयांमधील वाचनसाहित्य संग्रहाचा आढावा घेतला आहे. जिल्हा शासकीय एकूण ३५ ग्रंथालायांपैकी पैकी २८ ग्रंथालयांचा प्रतिसाद संशोधकास प्राप्त झाला आहे. तसेच प्रस्तुत लेखामध्ये जिल्हा शासकीय ग्रंथालयांना स्वतःची इमारत आहे किंवा नाही याबाबतचा आढवा देखील घेतला आहे. सार्वजनिक ग्रंथालय हे असे ग्रंथालय असते की, जे समाजामधील सर्वसामान्य व्यक्तींसाठी खुले असते. या ठिकाणी प्रत्येक व्यक्तीला विनामूल्य किंवा अत्यल्प शुल्कामध्ये वाचन, अभ्यास, संशोधन आणि माहिती प्राप्त करण्याची सुविधा दिली जाते. या जिल्हा शासकीय ग्रंथालयांच्या माध्यमातून ज्ञान आणि माहितीचा प्रसार करणे, सर्वच प्रकारच्या वाचकांमध्ये वाचनाची आवड आणि वाचनाची सवय निर्माण करणे, सांस्कृतिक विकास साधने आणि समाजामधील लोकांमध्ये माहितीविषयक साक्षरता निर्माण करण्याचे एक अत्यंत महत्वाचे व मोलाचे कार्य ही ग्रंथालये पार पडत असतात. या दृष्टीकोनातून प्रस्तुत संशोधनात्मक लेखामध्ये प्रतिसाद प्राप्त २८ ग्रंथालयांमधील वाचनसाहित्यसंग्रह व ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत याविषयी आढावा घेतला आहे.

शोधसंज्ञा **:** ग्रंथालय, सार्वजनिक ग्रंथालय व वाचनसाहित्यसंग्रह.

**प्रस्तावना** :

ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था असून ज्ञानावर आधारित समाजाची निर्मिती करण्यात ग्रंथालयांची महत्वपूर्ण भूमिका आहे. समाजाचा सामाजिक, बौद्धिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासामध्ये ग्रंथालयांचे मोलाचे योगदान आहे. विशेषतः सार्वजनिक ग्रंथालये ही लोकांनी, लोकांसाठी व शासकीय अनुदानावर चालणारी असल्यामुळे ती समाजामधील विविध घटकांची माहितीची गरज व मनोरंजनाचे कार्य अविरतपणे पार पडत आहेत. ही ग्रंथालये समाजमनाशी जोडली गेली असल्यामुळे समाजाचा मानसिक, बौद्धिक विकास तसेच लोकशाहीची नीतीमुळे व त्यांचे जतन व संवर्धन करत असतात. वरील सर्व बाबी या उपभोक्त्यांच्या वाचनामधून निर्माण होत असतात. या दृष्टीकोनातून महाराष्ट्रामधील जिल्हा शासकीय ग्रंथालयांमध्ये असणाऱ्या वाचनसाहित्यसंग्रहाचा आढावा घेण्यात आला आहे.

**व्याख्या :**

"ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रे आणि इतर साहित्य (सीडी/डीव्हीडी) यांचा संग्रह असलेले ठिकाण किंवा इमारत म्हणजे ग्रंथालय होय, जेथे उपभोक्ते वाचनासाठी आणि माहिती प्राप्त करण्यासाठी येतात. ग्रंथालयांमध्ये वाचक, ग्रंथ आणि कर्मचारी हे तीन घटक येथे महत्वाचे असतात."



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1 – 2025

सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे असे ग्रंथालय जे समाजामधील सर्वसामान्य व्यक्तींसाठी खुले असते आणि प्रत्येक नागरिकाला वाचन, अभ्यास, संशोधन आणि माहिती प्राप्त करून घेण्याचा समान अधिकार असतो. हे ग्रंथालय सार्वजनिक निधीतून चालते आणि नागरिकांना पुस्तके, मासिके, चित्रपट आणि डिजिटल संसाधने वापरण्याची सुविधा देते.

युनेस्कोच्या जाहीरनाम्यातील सार्वजनिक ग्रंथालायची व्याख्या पुढीलप्रमाणे देण्यात आली आहे.

१. या ग्रंथालयांवरील खर्चाचा मोठा हिस्सा हा सार्वजनिक निधीतून जमा होत असतो.
२. ग्रंथालय मुक्तद्वार असते व सर्व जातीधर्माच्या वाचकांना कोणताही भेदभाव न करता मोफत ग्रंथालयीन सेवा दिली जाते.
३. ग्रंथालयाचे स्वरूप एखाद्या स्वंयसेवी शैक्षणिक संस्थेसारखे असते, तेथे निरंतर शिक्षण देण्याची कामगिरी सातत्याने होत असते.
४. वाचकांना विविध विषयांवरील जास्तीत जास्त माहिती कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय निरपेक्षपणे उपलब्ध करून दिली जाते. त्यासाठी विविध शैक्षणिक व माहिती प्रदान करणारी साधने एकत्र केलेली असतात. विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम हाती घेतले जातात.

वरीलप्रमाणे युनोस्केच्या जाहीरनाम्यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयाची व्याख्या दिली आहे.

वाचनसाहित्यसंग्रह म्हणजे ग्रंथ किंवा लिखित आणि छापील स्वरूपातील माहिती साधनांचा संग्रह होय, जो ज्ञान मिळविण्यासाठी, जतन करण्यासाठी आणि संवर्धन करण्यासाठी केला जातो.

**उद्दिष्टे :**

१. महाराष्ट्रातील जिल्हा शासकीय ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रहाचा आढावा घेणे.
२. महाराष्ट्रातील जिल्हा शासकीय ग्रंथालयांच्या स्वतंत्र इमारतीचा आढावा घेणे.

**गृहीतके :**

१. महाराष्ट्रातील जिल्हा शासकीय ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रह मुबलक प्रमाणात आहे.
२. बहुतांश जिल्हा शासकीय ग्रंथालयांना स्वतःची स्वतंत्र इमारत आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून सर्वेक्षण/पाहणी या तंत्राचा अवलंब करण्यात आला आहे.

**माहिती संकलन :**

माहितीचे संकलन करण्यासाठी संशोधकाने प्रश्नावली व मुलाखत या साधनाचा उपयोग केला आहे. प्रश्नावलीद्वारे एकूण ३५ जिल्हा शासकीय ग्रंथालयांपैकी २८ ग्रंथालयांनी प्रश्नावलीस प्रतिसाद दिलेला आहे. २८ जिल्हा शासकीय ग्रंथालयांकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

**माहितीचे विश्लेषण :**

संकलित करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

सारणी क्र. १: ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाची माहिती दर्शविणारी सारणी




Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1 – 2025

| अ.क्र. | ग्रंथसंख्या | ग्रंथालयांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ५००० ते १५००० | ०१ | ०३.५७% |
| २. | १५००१ ते ५०००० | १० | ३५.७१% |
| ३. | ५०००१ ते १००००० | ०९ | ३२.१४% |
| ४. | १००००१ ते १५०००० | ०६ | २१.४३% |
| ५. | १५०००१ ते २००००० | ०१ | ०३.५७% |
| ६. | २०००0१ ते २५०००० | ०१ | ०३.५७% |
| | एकूण | २८ | १००.००% |

आलेख क्र. १: ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाची माहिती दर्शविणारा आलेख




सारणी व आलेख क्र. १ वरून असे आढळून येते की, ५००० ते १५००० ग्रंथसंख्या असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या ०१ असून त्यांचे प्रमाण ३.५७% आहे. १५००१ ते ५०००० एवढी ग्रंथसंख्या असलेल्या ग्रंथालयांची संख्या १० असल्याचे आढळून आलेले आहे व त्यांचे प्रमाण ३५.७१% इतके आहे. ५०००१ ते १००००० इतकी ग्रंथसंख्या असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या ०९ असून त्यांचे प्रमाण ३२.१४% आहे. ०६ ग्रंथालयांची ग्रंथसंख्या १००००१ ते १५०००० या दरम्यान असल्याचे आढळून आले असून त्यांचे प्रमाण २१.४३% एवढे आहे. तर १५०००१ ते २००००० आणि २००००१ ते २५०००० या दरम्यान ग्रंथसंख्या असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या अनुक्रमे ०१ व ०१ असून त्यांचे प्रमाण ३.५७% इतके असल्याचे दिसून येते. एकूणच सर्वात अधिक १० ग्रंथालयांमध्ये १५००१ ते ५०००० दरम्यान ग्रंथसंख्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

सारणी क्र. २: ग्रंथालयातील नियतकालिकांच्या संग्रहाची माहिती दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | नियतकालिकांची संख्या | ग्रंथालयांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ० ते ५० | १७ | ६०.७२% |
| २. | ५१ ते १०० | १० | ३५.७१% |



Copyright © | JET Network, All Rights Reserved

**Journal of East-West Thought**
**ISSN: *2168-2259 (online)***
**(*https://jetjournal.us/*)**
**Volume 15, Issue 1 – 2025**

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | १०० पेक्षा अधिक | ०१ | ०३.५७% |
| | एकूण | २८ | १००.००% |

सारणी क्र. २ वरून असे लक्षात येते की, २८ जिल्हा शासकीय ग्रंथालायांपैकी १७ ग्रंथालयांमधील नियतकालिकांची संख्या ० ते ५० दरम्यान असून त्यांचे प्रमाण ६०.७२% एवढे आहे. तर ५१ ते १०० दरम्यान नियतकालिकांचा संग्रह असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या १० असून त्यांचे प्रमाण ३५.७१% इतके आहे. तर १०० पेक्षा अधिक नियतकालिकांचा संग्रह असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या ०१ असल्याचे निदर्शनास आले असून त्यांचे प्रमाण ३.५७% इतके आहे. याबाबत सर्वांगीण विचार करता सर्वात अधिक १७ ग्रंथालये ही ० ते ५० दरम्यान नियतकालिकांचा संग्रह करत असल्याचे दिसून येते.

सारणी क्र. ३: ग्रंथालयातील नियतकालिकांच्या बांधीव खंडांच्या संग्रहाची माहिती दर्शविणारी सारणी

| **अ.क्र.** | **नियतकालिकांचे बांधीव खंड** | **ग्रंथालयांची संख्या** | **प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | ० ते २५ | २१ | ७५.००% |
| २. | २६ ते ५० | ०६ | २१.४३% |
| ३. | ५० पेक्षा अधिक | ०१ | ०३.५७% |
| | एकूण | २८ | १००.००% |

सारणी क्र.३ वरून असे लक्षात येते की, प्रतिसाद प्राप्त एकूण २८ जिल्हा शासकीय ग्रंथालायांपैकी २१ ग्रंथालयांमध्ये नियतकालिकांच्या बांधीव खंडांची संख्या ० ते २५ दरम्यान असल्याचे दिसून येते, ज्यांचे प्रमाण ७५.००% आहे. तर २६ ते ५० दरम्यान नियतकालिकांच्या बांधीव खंड असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या ०६ असून त्यांचे प्रमाण २१.४३% असल्याचे दिसून येते. तसेच नियतकालिकांचे बांधीव खंड ५० पेक्षा अधिक असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या ०१ असून त्याचे प्रमाण ३.५७% एवढे असल्याचे आढळून येते. एकूणच सर्वात अधिक २१ जिल्हा शासकीय ग्रंथालयांमध्ये ० ते २५ दरम्यान नियतकालिकांचे बांधीव खंड असल्याचे दिसून येते.

सारणी क्र. ४: ग्रंथालयातील वर्तमानपत्रांच्या संख्येची माहिती दर्शविणारी सारणी

| **अ.क्र.** | **वर्तमानपत्रांची संख्या** | **ग्रंथालयांची संख्या** | **प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | ० ते १० | ०५ | १७.८६% |
| २. | ११ ते २० | १६ | ५७.१४% |
| ३. | २१ ते ३० | ०६ | २१.४३% |
| ४. | ३० पेक्षा अधिक | ०१ | ०३.५७% |
| | एकूण | २८ | १००.००% |

सारणी क्र. ४ वरून असे दिसून येते की, प्रतिसाद प्राप्त एकूण २८ जिल्हा शासकीय ग्रंथालायांपैकी ०५ ग्रंथालयांमध्ये ० ते १० दरम्यान वर्तमानपत्रे उपलब्ध असल्याचे दिसून आले असून त्यांचे प्रमाण १७.८६% इतके आहे. ११ ते २० दरम्यान वर्तमानपत्रे उपलब्ध असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या १६ असून त्यांचे प्रमाण ५७.१४% एवढे आहे. तसेच २१ ते ३० वर्तमानपत्रांची सदस्यता घेतलेल्या ग्रंथालयांची संख्या ०६ असून



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1 – 2025

त्यांचे प्रमाण २१.४३% इतकी असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे ३० पेक्षा अधिक वर्तमानपत्रे उपलब्ध असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या ०१ असून त्याचे प्रमाण ३.५७ % एवढे असल्याचे दिसून येते. एकूणच २८ जिल्हा शासकीय ग्रंथालयांपैकी सर्वात अधिक म्हणजे १६ ग्रंथालयांमध्ये ११ ते २० दरम्यान वर्तमानपत्रांची उपलब्धता असल्याचे आढळून आले आहे.

सारणी क्र. ५: ग्रंथालयातील सी.डी./डी.व्ही.डी. यांच्या संख्येची माहिती दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | सी.डी./डी.व्ही.डी. यांची संख्या | ग्रंथालयांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ० ते २५ | १३ | ४६.४३% |
| २. | २६ ते ५० | १० | ३५.७१% |
| ३. | ५१ ते ७५ | ०३ | १०.७१% |
| ४. | ७५ पेक्षा अधिक | ०२ | ०७.१४% |
| | एकूण | २८ | १००.००% |

सारणी क्र. ५ वरून असे दिसून येते की, प्रतिसाद प्राप्त एकूण २८ जिल्हा शासकीय ग्रंथालायांपैकी १३ ग्रंथालयांमध्ये ० ते २५ दरम्यान सी.डी./डी.व्ही.डी. उपलब्ध असल्याचे दिसून आले असून त्यांचे प्रमाण ४६.४३% इतके आहे. २६ ते ५० दरम्यान सी.डी./डी.व्ही.डी. यांची उपलब्धता असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या १० असून त्यांचे प्रमाण ३५.७१% एवढे आहे. तसेच ५१ ते ७५ दरम्यान सी.डी./डी.व्ही.डी. यांची उपलब्धता असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या ०३ असून त्यांचे प्रमाण १०.७१% इतके असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे ७५ पेक्षा अधिक सी.डी./डी.व्ही.डी. उपलब्ध असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या ०२ असून त्याचे प्रमाण ७.१४ % एवढे असल्याचे आढळून आले आहे. एकूणच २८ जिल्हा शासकीय ग्रंथालयांपैकी सर्वात अधिक म्हणजे १३ ग्रंथालयांमध्ये ० ते २५ दरम्यान सी.डी./डी.व्ही.डी.ची उपलब्धता असल्याचे दिसून आले आहे.

सारणी क्र. ६: ग्रंथालयातील देणगीप्राप्त ग्रंथसंग्रहाबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | देणगीप्राप्त ग्रंथसंख्या | ग्रंथालयांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ० ते १००० | ०७ | २५.००% |
| २. | १००१ ते ३००० | १३ | ४६.४२% |
| ३. | ३००१ ते ५००० | ०४ | १४.२९% |
| ४. | ५००० पेक्षा अधिक | ०४ | १४.२९% |
| | एकूण | २८ | १००.००% |

सारणी क्र. ६ वरून असे आढळून येते की, प्रतिसाद प्राप्त एकूण २८ जिल्हा शासकीय ग्रंथालायांपैकी ०७ ग्रंथालयांमध्ये ० ते १००० दरम्यान देणगीच्या माध्यमातून ग्रंथ उपलब्ध असल्याचे दिसून आले असून त्यांचे प्रमाण २५.००% इतके आहे. १००१ ते ३००० इतका ग्रंथसंग्रह देणगीच्या माध्यमातून प्राप्त झाला आहे अशा ग्रंथालयांची संख्या १३ असून त्यांचे प्रमाण ४६.४२% एवढे आहे. त्याचप्रमाणे ३००१ ते ५००० व ५००० पेक्षा अधिक ग्रंथ ग्रंथालयास देणगीच्या स्वरुपात प्राप्त झाले असून अशा ग्रंथालयांची संख्या अनुक्रमे ०४



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1 – 2025

व ०४ असून त्यांचे प्रमाण अनुक्रमे १४.२९% एवढे असल्याचे दिसून येते. एकूणच सर्वात अधिक म्हणजेच १३ ग्रंथालयांना १००१ ते ३००० दरम्यान ग्रंथ हे देणगीच्या स्वरूपामध्ये प्राप्त झाल्याचे दिसून येते.

सारणी क्र. ७: जिल्हा शासकीय ग्रंथालयांच्या स्वतंत्र इमारतीबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | ग्रंथालय इमारत | ग्रंथालयांची संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्वतंत्र इमारत आहे | २२ | ७८.५७% |
| २. | स्वतंत्र इमारत नाही | ०६ | २१.४३% |
| | एकूण | २८ | १००.००% |

सारणी क्र. ४.७ व आलेख क्र. ४.७ वरून असे आढळून येते की, महाराष्ट्रामधील एकूण २८ जिल्हा शासकीय ग्रंथालयांपैकी २२ जिल्हा शासकीय ग्रंथालयांना स्वतःची स्वतंत्र इमारत असल्याचे दिसून आले असून त्यांचे प्रमाण ७८.५७% इतके आहे. तर उर्वरित ०६ जिल्हा शासकीय ग्रंथालयांना स्वतःची स्वतंत्र इमारत नसून ते भाडेतत्वावरील इमारतीमध्ये ग्रंथालय चालवत असल्याचे निदर्शनास आले असून त्यांचे प्रमाण २१.४३% एवढे आहे. स्वतःची स्वतंत्र इमारत असणाऱ्या जिल्हा शासकीय ग्रंथालयांची संख्या अधिक असल्याचे दिसून येते, जी २२ इतकी आहे.

**गृहीतक चाचणी :**

१. गृहीतक क्र. १ साध्य झालेले आहे. महाराष्ट्रातील प्रतिसाद प्राप्त २८ जिल्हा शासकीय ग्रंथालयांमध्ये पुस्तके, नियतकालिके, वर्तमानपत्रे, नियतकालिकांचे बांधीव खंड आणि देण्गीप्राप्त ग्रंथ मुबलक प्रमाणामध्ये उपलब्ध आहेत.
२. गृहीतक क्र. २ साध्य झालेले आहे. महाराष्ट्रातील प्रतिसाद प्राप्त २८ जिल्हा शासकीय ग्रंथालयांपैकी २२ ग्रंथालयांना स्वतःची स्वतंत्र इमारत आहे.

**संदर्भसूची :**

१. वीर, डी.के. आणि पवार, रामेश्वर (२००१). *सार्वजनिक ग्रंथालय*, परभणी : जिल्हा ग्रंथालय संघ. पृ. ०९.
२. नरगुंदे, रेवती (२००५). *प्रलेखन आणि माहितीशास्त्र*, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.
३. कुंभार, राजेंद्र (२०१५). *सार्वजनिक ग्रंथालयासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम*, ज्ञानगंगोत्री. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ. डिसेंबर ते मे पृ. ४ ते ५.
४. Maurya, R. J. (२०१६), *role of oublic libraries in the development of society*, Library Waves, volume २.
५. https://vishwakosh.marathi.gov.in/22593/
६. https://dol.maharashtra.gov.in/
७. www.bahuwidh.com
८. https://dlis.maharashtra.gov.in
९. www.vikaspedia.org



Copyright © | JET Network, All Rights Reserved